# पुणे महानगरपालिका.

जाहिरात प्रकटन,

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील विविध गटातील उमेदवारांची खालील पदांसाठी निवडयादी /प्रतिक्षायादी तयार करणेकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | वेतन श्रेणी | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांख्यिकी व संगणक प्रमुख (वर्ग-१) | रु.१०६५० ते २२१५०+ मान्य भत्ते. | १) मान्य विद्यापीठाची शास्त्र शाखेकडील संख्या शास्त्र विषय घेऊन किमान द्वितीय श्रेणीतील पदवीधारक.<br>२) सरकारमान्य तांत्रिक प्रशिक्षण संस्था किंवा विद्यापीठ यांचेकडील कॉम्प्युटर ॲप्लिकेशन मधील पदव्युत्तर पदवी/पदवीधारक.<br>३) संगणक क्षेत्रातील सांख्यिंकी कामाचा शासकीय, निमशासकीय अथवा खासगी संस्थेमधील कामाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य. | १ (निवड यादी) | खुला | - | |
| २ | सिस्टिम मॅनेजर (ई-प्रशासन) | रु.१०६५० ते १५८५०+ मान्य भत्ते | बी.ई./बी.टेक. इन इलेक्ट्रॉनिक्स ॲंड कम्युनिकेशन/बी.ई इलेक्ट्रॉनिक्स/कॉम्प्युटर सायन्स/कॉम्प्युटर इंजिनिअर किमान ३ वर्षाचा सरकारी / निमसरकारी अथवा नामांकित मान्यताप्राप्त संस्थेतील विशेषत: ERP/SAP कामाचा अनुभव आवश्यक. | १ (निवड यादी) | खुला | - | |
| ३ | उप मुख्य लेखापाल (वर्ग-१) | रु.१०००० ते २०२५० + मान्य भत्ते | सी.ए किंवा आय.सी.डब्ल्यु.ए किंवा सी.एस, संगणकाचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक. | २ (निवड यादी) | १ अजा<br>१ खुला | मुख्य लेखापाल कार्या | |

## अटी:-

१) **वयोमर्यादा** :-

(**अ**) पदासाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाला किमान वय १८ वर्षे पुर्ण असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिलक्षम राहील).

(**ब**) माजी सैनिक/प्रकल्प ग्रस्त/भुकंप ग्रस्त यांच्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

(**क**) स्वातंत्र सैनिक नामनिर्देशित पाल्य/खेळाडू (५) वर्ष/जनगनना कर्मचारी इत्यादींसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

(**ड**) आधीच पुणे महानगरपालिकेच्या सेवेत असणाऱ्या उमेदवारास कमाल वयाची अट लागु होणार नाही.

२) अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

३) **उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.**

४) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-१०९३/प्र.क्र.३६६/का-२ दि.२२/६/९४ महिलांसाठी असणारे आरक्षण अनुज्ञेय राहील.

५) शासन आदेशानुसार प्रकल्प ग्रस्तांसाठी आवश्यक असलेले आरक्षण अनुज्ञेय राहील. पुणे जिल्ह्यातील टेमघर प्रकल्पग्रस्त असल्यास प्राधान्य.

६) शासन आदेशानुसार माजी सैनिक, खेळाडू, अपंग यांचेसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय राहील.

७) शारिरीक अपंग व्यक्तीसाठी राखीव पदावरील नियुक्ती संबंधित प्रवर्गाचे किमान ४०% अपंगत्वाचे संबंधित जिल्ह्याच्या शासकिय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकिय तज्ञाने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.

८) वरील अ.क्र.३ येथील पदासाठी दिनांक ०७/०८/२००१ व दिनांक २०/०७/२००२ व आजपर्यंतच्या सर्व शासन निर्णयान्वये DOEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O स्तर, किंवा A स्तर, किंवा B स्तर, किंवा C स्तर, किंवा MS-CIT परिक्षा नेमणूक झाल्यापासून २ वर्षात उत्तीर्ण होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

९) वरील अनुक्रमांक १ येथील सांख्यिंकि व संगणक प्रमुख व अनुक्रमांक २ येथील सिस्टीम मॅनेजर (ई-प्रशासन) या पदांसाठी तिसऱ्यांदा व अनुक्रमांक ३ उप मुख्य लेखापाल या पदावरील अजा गटाच्या एका जागेसाठी चौथ्यांदा जाहिरात प्रस्तुत करण्यात येत आहे. वरील अ.क्र.१, २, ३ येथील पदांसाठी फेर जाहिरात दिली आहे. ज्या उमेदवारांनी यापुर्वी वरील पदांसाठी अर्ज केलेले आहेत त्यांनी परत अर्ज क रण्याची आवश्यकता नाही.

१०) निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णयानुसार नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

११) अंशकालीन कर्मचाऱ्यांची, त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक आहे. तसे केल्याचे पुरावे अर्जासोबत जोडावेत. तसेच उमेदवार माजी सैनिकांचे वारस असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकित प्रत करून अर्जासोबत जोडावीत. भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१२) माजी सैनिकांच्या समांतर आरक्षणामध्ये युध्दात /सैन्य दलातील सेवेत मृत्यु पावलेल्या किंवा अपंग झालेल्या सैनिकांच्या वारसास प्राधान्य दिले जाईल. त्यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात नाव नोंदणी केल्याचे नोंदणीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१३) **खुल्या गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना रु.१००/- किमतीचे व आरक्षीत गटासाठी अर्ज करणाऱ्या मागसवर्गीय उमेदवारांना रु. ५०/- किमतीचे पुणे मनपाचे छापील फॉर्म मा. महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली १) मा.उप आयुक्त क्र.१. घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय, घोलेरोड मनपा मुद्रणालया समोर,पुणे ४, २) मा.उप आयुक्त क्र.२. ढोलेपाटीलरोड क्षेत्रिय कार्यालय, ढोलेपाटील मार्केट इमारत, पुणे १.३) मा.उप आयुक्त क्र.३.- टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय,९९०,शुक्रवारपेठ,शिवाजीराव ढेरे उद्योग भवन टिळकरोड, पुणे ३०.,४) मा.उप आयुक्त क्र.४- टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय,९९० शुक्रवारपेठ, शिवाजीराव ढेरे उद्योग भवन टिळकरोड, पुणे ३० येथे दि.२/९/२००८ ते दि.१२/९/२००८ अखेर (पर्यंत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत विकत मिळतील व दि.१८/९/२००८ दुपारी ४.०० पर्यंत स्विकारले जातील. सदरचे फॉर्म पोस्टाने अगर व्हिपीने मनिऑर्डर रक्कम स्विकृत करुन पाठविले जाणार नाहीत.**

१४) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (ट्रु-कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. तसेच टपाल खात्याची दिरंगाई वा कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अशा अपात्र ठरलेल्या अर्जांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५) **वरील पदांवर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त होणारा उमेदवार पुणे महानगरपालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहील.**

१६) आरक्षीत पदांकरीता निवड झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र शासन नियमाप्रमाणे विहीत मुदतीत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द ठरविण्यात येईल.

१७) रिक्त पदाच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या मर्यादित करणेसाठी पात्रता (चाळणी) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

१८) उमेदवार सरकारी / निमसरकारी किंवा महापालिका सेवेत असल्यास त्यांचे अर्ज त्यांचे खाते प्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

१९) मुलाखतीस बोलाविणेत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

२०) मुलाखतीस बोलाविणेचे अंतिम अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

२१) महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

२२) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी अपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्त समाप्त करण्यात येईल.

२३) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर व्ही २०००/प्र.क्र. १७/२०००/१२ दि.१/७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दि.२८/३/२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापन संबंधित उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**सही :- प्रविणसिंह परदेशी**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका.**